सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार

वर्ष २, अंक १०] गुरुवार, मे ६, २०१०/वैशाख १६, शके १९३२ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २६.००

असाधारण क्रमांक २०

## प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६.**— मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम . . | १-४ |

दिनांक ६ मे २०१० रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ह. बा. पटेल,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

## सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक ६ मे २०१० रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

### मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.

१९५९चा मुंबई ३. १९६२चा महा. ५.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांत आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या एकसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

प्रकरण एक

**प्रारंभिक**

संक्षिप्त नाव. **१.** या अधिनियमास, मुंबई ग्रामपंचायत व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अधिनियम, २०१० असे म्हणावे.

प्रकरण दोन

**मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ याची सुधारणा.**

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १४ ची सुधारणा.

**२.** मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश " ग्रामपंचायत अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या कलम १४ मधील पोट-कलम (१) मध्ये, खंड (ज-३) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— १९५९चा मुंबई ३.

" (ज-४) कलम १४ख अन्वये राज्य निवडणूक आयोगाकडून निरर्ह ठरविण्यात आलेली व्यक्ती ; किंवा ".

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ यात कलम १४ख समाविष्ट करणे.

**३.** ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १४क नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

राज्य निवडणूक आयोगाकडून निरर्ह ठरविणे.

" **१४ख.** (१) जर राज्य निवडणूक आयोगाची अशी खात्री पटली असेल की, एखाद्या व्यक्तीने,—

(क) राज्य निवडणूक आयोगाने निर्धारित केलेल्या वेळेमध्ये आणि आवश्यक केलेल्या रीतीने, निवडणूक खर्चाचा हिशेब देण्यात कसूर केली आहे, आणि

(ख) अशा कसुरीसाठी तिच्याकडे कोणतेही योग्य कारण किंवा समर्थन नाही,

तर, राज्य निवडणूक आयोग, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, ती व्यक्ती निरर्ह असल्याचे घोषित करील ; आणि अशी व्यक्ती, अशा आदेशाच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीकरिता, पंचायत सदस्य म्हणून राहण्यास किंवा असा सदस्य होण्यासाठी निवडणूक लढविण्यास निरर्ह असेल.

(२) राज्य निवडणूक आयोगास, कारणे लेखी नोंदवून, पोट-कलम (१) खालील कोणतीही निरर्हता दूर करता येईल किंवा असा कोणत्याही निरर्हतेचा कालावधी कमी करता येईल. ".

प्रकरण तीन

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याची सुधारणा.**

१९६२ चा महा. ५. ४. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश " जिल्हा परिषद अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या कलम १५क नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ यात कलम १५ख समाविष्ट करणे.

" **१५ख.** (१) जर राज्य निवडणूक आयोगाची अशी खात्री पटली असेल की, एखाद्या व्यक्तीने,— राज्य निवडणूक आयोगाकडून निरर्ह ठरविणे.

(क) राज्य निवडणूक आयोगाने निर्धारित केलेल्या वेळेमध्ये आणि आवश्यक केलेल्या रीतीने, निवडणूक खर्चाचा हिशेब देण्यात कसूर केली आहे, आणि

(ख) अशा कसुरीसाठी तिच्याकडे कोणतेही योग्य कारण किंवा समर्थन नाही,

तर, राज्य निवडणूक आयोग, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, तो व्यक्ती निरर्ह असल्याचे घोषित करील ; आणि अशी व्यक्ती अशा आदेशाच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीकरिता, परिषदेचा सदस्य म्हणून राहण्यास किंवा परिषद सदस्य होण्यासाठी निवडणूक लढविण्यास निरर्ह असेल.

(२) राज्य निवडणूक आयोगास, कारणे लेखी नोंदवून, पोट-कलम (१) खालील कोणतीही निरर्हता दूर करता येईल किंवा असा कोणत्याही निरर्हतेचा कालावधी कमी करता येईल. ".

५. जिल्हा परिषद अधिनियमाच्या कलम १६ मध्ये, पोट-कलम (१) मधील, खंड (ढ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम १६ ची सुधारणा.

" (ण) जर तो, कलम १५ख अन्वये राज्य निवडणूक आयोगाकडून निरर्ह ठरविण्यात आला असेल तर. ".

६. जिल्हा परिषद अधिनियमाच्या कलम ६२ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ यात कलम ६२क समाविष्ट करणे.

" **६२क.** (१) जर राज्य निवडणूक आयोगाची अशी खात्री पटली असेल की, एखाद्या व्यक्तीने,— राज्य निवडणूक आयोगाकडून निरर्ह ठरविणे.

(क) राज्य निवडणूक आयोगाने निर्धारित केलेल्या वेळेमध्ये आणि आवश्यक केलेल्या रीतीने, निवडणूक खर्चाचा हिशेब देण्यात कसूर केली आहे, आणि

(ख) अशा कसुरीसाठी तिच्याकडे कोणतेही योग्य कारण किंवा समर्थन नाही,

तर, राज्य निवडणूक आयोग, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, ती व्यक्ती निरर्ह असल्याचे घोषित करील ; आणि अशी व्यक्ती अशा आदेशाच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीकरिता, सदस्य म्हणून राहण्यास किंवा सदस्य होण्यासाठी निवडणूक लढविण्यास निरर्ह असेल.

(२) राज्य निवडणूक आयोगास, कारणे लेखी नोंदवून, पोट-कलम (१) खालील कोणतीही निरर्हता दूर करता येईल किंवा अशा निरर्हतेचा कालावधी कमी करता येईल. ".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष २, अंक २०] गुरुवार, मे ६, २०१०/वैशाख १६, शके १९३२ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ११.००

असाधारण क्रमांक ४२


प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Bombay Village Panchayats and Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Amendment) Act, 2010 (Mah. Act No. XVI of 2010), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. XVI of 2010.

*(First Published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette" on the 6th May 2010).*

An Act further to amend the Bombay Village Panchayats Act, 1958 and the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961.

Bom. III of 1959. Mah. V of 1962. WHEREAS it is expedient further to amend the Bombay Village Panchayats Act, 1958 and the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961, for the purposes hereinafter appearing, it is hereby enacted in the Sixty-first Year of the Republic of India as follows :—

### CHAPTER I

PRELIMINARY

**1.** This Act may be called the Bombay Village Panchayats and Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Amendment) Act, 2010. Short title.

## CHAPTER II

### AMENDMENTS TO THE BOMBAY VILLAGE PANCHAYATS ACT, 1958.

Amendment of section 14 of Bom. III of 1959.

**2.** In section 14 of the Bombay Village Panchayats Act, 1958 (hereinafter, in this Chapter, referred to as "the Village Panchayats Act"), in sub-section (*1*), after clause (*j-3*,) the following clause shall be inserted, namely :— Bom. III of 1959.

"(*j-4*) has been disqualified by the State Election Commission under section 14B; or ".

Insertion of section 14B in Bom. III of 1959.

**3.** After section 14A of the Village Panchayats Act, the following section shall be inserted, namely :—

Disqualification by State Election Commission.

"**14B.** (*1*) If the State Election Commission is satisfied that a person,—

(*a*) has failed to lodge an account of election expenses within the time and in the manner required by the State Election Commission, and

(*b*) has no good reason or justification for such failure,

the State Election Commission may, by an order published in the *Official Gazette,* declare him to be disqualified and such person shall be disqualified for being a member of *panchayat* or for contesting an election for being a member for a period of five years from the date of the order.

(*2*) The State Election Commission may, for reasons to be recorded, remove any disqualification under sub-section (*1*) or reduce the period of any such disqualification.".

## CHAPTER III

### AMENDMENTS TO THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

Insertion of section 15B in Mah. V of 1962.

**4.** After section 15A of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (hereinafter, in this Chapter, referred to as "the Zilla Parishads Act"), the following section shall be inserted, namely :— Mah. V of 1962.

Disqualification by State Election Commission.

"**15B.** (*1*) If the State Election Commission is satisfied that a person,—

(*a*) has failed to lodge an account of election expenses within the time and in the manner required by the State Election Commission, and

(*b*) has no good reason or justification for such failure,

the State Election Commission may, by an order published in the *Official Gazette,* declare him to be disqualified and such person shall be disqualified for being a Councillor or for contesting an election for being a Councillor for a period of five years from the date of the order.

(2) The State Election Commission may, for reasons to be recorded, remove any disqualification under sub-section (*1*) or reduce the period of any such disqualification.".

Amendment of section 16 of Mah. V of 1962.

**5.** In section 16 of the Zilla Parishads Act, in sub-section (*1*), after clause (*n*), the following clause shall be inserted, namely :—

"(*o*) if he has been disqualified by the State Election Commission under section 15B.".

Insertion of section 62A in Mah. V of 1962.

**6.** After section 62 of the Zilla Parishads Act, the following section shall be inserted, namely :—

Disqualification by State Election Commission.

"**62A.** (*1*) If the State Election Commission is satisfied that a person,—

(*a*) has failed to lodge an account of election expenses within the time and in the manner required by the State Election Commission, and

(*b*) has no good reason or justification for such failure,

the State Election Commission may, by an order published in the *Official Gazette*, declare him to be disqualified and such person shall be disqualified for being a member or for contesting an election for being a member for a period of five years from the date of the order.

(2) The State Election Commission may, for reasons to be recorded, remove any disqualification under sub-section (*1*) or reduce the period of any such disqualification.".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI